क्रमांक: जमीन-२६९०/१६०३/प्र.क्र.२२६६/ज३.

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ५-१२-९२

विषय:- जमीन: मुंबई उपनगर जिल्हा
मौजे वान्द्रे, तालुका अंधेरी येथील स
न.भू.क्र.बी-२११ लगतच्या खाडी जमिनीपैकी
खाडिश्वरी मार्गावरील वसाहतीस वीजपुरवठा
करण्यासाठी मुंबई उपनगर विद्युत पुरवठा
कंपनीस विद्युत उपकेन्द्र बांधण्यासाठी मंजूर
करणेबाबत....

ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या क्र. ११/३अ/३-०१६२, दिनांक १५.७.१९९२ च्या वरील विषयाबाबतच्या पत्राच्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौजे वान्द्रे तालुका अंधेरी येथील न.भू.क्र.बी-२११ लगतच्या खाडिश्वरी मार्गावरील खाडी जमिनीपैकी ४००चौ.फू [३७.२०चौ.मी.] इतकी जमीन विद्युत केंद्र उभारण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीचे वितरण] नियम, १९७१ मधील तरतुदीनुसार तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटीवर आणि सदर जमिनीची तात्पुरती किंमत प्रति चौ.मी. रुपये २४२०/-[रुपये दोन हजार चारशे वीस फक्त] आकारून त्या किंमतीच्या १५ टक्के इतकी भुईभाड्याची किंमत आकारून १० वर्षांच्या भाडेपट्टीने पुढील विशेष अटीवर मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस मंजूर करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

१] मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीने तात्पुरती भाडेपट्टीची रक्कम व शासनाने निश्चित केलेली अंतीम भाडेपट्टीची रक्कम यांतील फरकाची रक्कम १५ टक्के व्याजासह शासनास जमा करावी लागेल.

२] रस्त्याच्या कडेला असलेल्या सर्व्हीस पाईपसाठी रस्त्याच्या पलिकडे पुरेशी मोकळी जागा ठेवावी.

३] उपरोक्त अटी मान्य व बंधनकारक असल्याचे हमीपत्र रु.१०/- च्या स्टॅम्प पेपरवर घ्यावे.

....२/-

OFFICE OF THE ... CTOR
BOM... DIST.
Date 17/12/92

Scanned by CamScanner

२. हे ज्ञापन, शासन ठराव, वित्त विभाग क्रमांक ओडिओ-१७७७/१३८/७७/व्यय-९, दिनांक २०.७.१९७७ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

म.मु.शिंदे

[म. मु. शिंदे]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
बी. एम. आर. डी. ए. इमारत,
बान्द्रे[पू.]मुंबई-४०००५१

प्रतिलिपी:-

१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२] महालेखाकार, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
३] अधिदान व लेखा अधिकारी,
४] निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
५] नगर विकास विभाग/नावि ११[आरडीपी], मंत्रालय,
६] वित्त विभाग/व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
७] निवड नस्ती, ज-३ कार्यासन, मुंबई.

Scanned by CamScanner

159

क्रमांक :११/कॉ/एल-५५८
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे
कार्यालय, बीएस·आर·डी·ए· इमारत,
१०वा मजला, वांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१·

दिनांक :- २-१-१९९३

वाचा:- १) शासन महसूल व वन विभाग शासन
क्रमांक : जमीन-२११०/११०१/प्र·क्र·२२११/ज-१
दिनांक ५·१२·९२·

आदेश

मौजे वांद्रे, तालुका अंधेरी येथील न·भू·क्र· डी-५११ लगतच्या आंबिवली मार्गावरील बाजूची जमिनीपैकी ४०० चौ·फू· (३७-२० चौ·मी·) इतकी जमीन विद्युत केंद्र उभारण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे विल्हेवाट) नियम १९७१ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची तात्पुरती किंमत दर प्रती चौ·मी· रु· २४१०/- आकारुन त्या किंमतीच्या १५% इतकी पूर्वभाड्याची किंमत आकारुन १० वर्षाच्या भाडेपट्टयाने मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस मंजूर करण्यास शासनाने उद्धृतिकेत उल्लेखित शासनाद्वारे दिलेल्या मंजूरीनुसार सदरहू जमिनीचा ताबा खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे·

१) पट्टेधारक कंपनीने, जमिनीची तात्पुरत्या प्रती चौ·मी· रु· २४१०/- प्रमाणे होणाऱ्या पूर्ण बाजारभावाच्या किंमतीच्या १५ टक्के दराने निश्चित केलेली तात्पुरती वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु· १४,०९४/- तहसिलदार अंधेरी यांचे कार्यालयात भरणा करावी·

२) मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीने उक्त निश्चित करण्यात आलेली तात्पुरती भाडेपट्टयाची रक्कम व शासनाने निश्चित केलेली अंतिम भाडेपट्टयाची रक्कम यातील फरकाची रक्कम १५ टक्के व्याजासह शासनास भरावी·

३) रस्त्याच्या कडेला असलेल्या तक्रीस पार्कसाठी रस्त्याच्या पलिकडे पुरेशी मोकळी जागा ठेवावी·

४) मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीने कंपनीना लागणाऱ्या जागा व्यतिरिक्त केलेले इतर सर्व बांधकाम असल्यास तात्पुरत्या स्वरूपाचे असावे·

५) मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस सदर जमिनीचा उपयोग

ज्या कारणासाठी जमीन दिली आहे त्याच कारणासाठी करावा.

(६) प्रस्ताधीन जमीन किंवा तीचा कोणताही भाग शासनाचे लेखी पूर्व संमती शिवाय विक्री भाडेपट्टा वा गहाण टाकू नये.

(७) शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रयोजना करिता प्रस्ताधीन जमिनीची आवश्यकता भासल्यास त्याबाबतीत जिल्हाधिकारी भाडेपट्टेधारकास एका महिन्याची लेखी नोटीस देऊन हा भाडेपट्टा कोणत्याही वेळी रद्द करु शकतील.

(८) उक्त भाडेपट्टा समाप्त झाल्याबद्दल पट्टेदाराला कोणत्याही भरपाई बाबत दावा सांगण्याचा अधिकार असणार नाही. व जमिनीचा तुकडा ज्या स्थितीत होता त्या स्थितीत त्याचा कब्जा तो जिल्हाधिकारी यांच्या स्वाधीन करील.

(९) शासनाचे धोरणाप्रमाणे फक्त गणना झालेल्याच झोपडीधारकांना मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी विद्युत जोडणी देईल.

(१०) उक्त अटी व शर्तींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरहू भाडेपट्टा रद्द झाल्याचे समजण्यात येऊन प्रस्ताधीन जमीन सरकारी जमा करण्यात येईल.

प्रस्ताधीन जमिनीचा ताबा संबंधीत नगर भूमापन अधिकारी क्र.१ म्युनिसिपल गॅरेज कंपाऊंड एस्.व्ही.रोड, सांताक्रुझ (प) मुंबई-४०००५४ यांचेकडून घ्यावा. तत्पूर्वी तात्पुरती वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु. १४,०९१/- तहसिलदार अंधेरी यांचेकडे प्रथम भरणा करावी.

सही/-xxx

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रती,

मुख्य अभियंता
मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी
इलेक्ट्रिसिटी हाऊस, सांताक्रुझ (पूर्व)
मुंबई-४०००५५.

Scanned by CamScanner

प्रत :- नगर भूमापन अधिकारी क्र.३ म्युनिसिपल मंडई कंपाऊंड, एस.व्ही.रोड, सांताक्रुझ (प) मुंबई-४०००५४ यांचेकडे जरूर त्या कार्यवाही करिता रवाना.

त्यांना विनंती करण्यात येते की, पट्टेधारक कंपनीने वरील प्रमाणे भाडेपट्ट्याची रक्कम भरणा केल्याची त्यांना प्रथम खात्री करावी व त्यानंतर सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविण्यात आलेल्या २०x२० = ४०० चौ. फू. (३७-१०) चौ.मी. जमिनीचा ताबा मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीला देऊन ताबा पावतीच्या व नकाशाच्या दोन/तीन प्रतीसह पूर्तता अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा. तसेच, मिळकत पत्रिकेत जरूर त्या नोंदी घेऊन त्याच्या प्रती सादर कराव्यात.

प्रत :- तहसिलदार अंधेरी यांचेकडे भाडेपट्टा रकमेच्या वसुलीसाठी रवाना.

सही/-

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

21/1/93
S.E.M.

211193

ISSUED

Scanned by CamScanner